हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : ०७.०३.२०१५

प्रति,
मा. संपादक / मुख्य पत्रकार,
..........................

कृपया प्रसिद्धीसाठी

## शिवजयंतीच्या मिरवणुकांवर बंदी आणू पहाणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर भाजप शासनाने कठोरात कठोर कारवाई करावी ! – हिंदु जनजागृती समिति

मुंबई – महाराष्ट्रामध्ये पोलिसांनी नव्या मंडळांच्या शिवजयंतीच्या मिरवणुका आणि सर्वच मिरवणुकांतील मर्दानी खेळांवर बंदी घालण्याविषयी दिलेला आदेश ऐकून हा 'छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र आहे कि मोगलांचा', असा प्रश्‍न पडतो. 'अफझलखानवधा'चे चित्र असो वा 'शाहिस्तेखानाची बोटे छाटल्याचे चित्र' असो, महाराष्ट्रामध्ये पोलिसांकडून ती लावण्यावर अघोषित बंदी आणली जाते. पुण्यात गणेशोत्सवातील मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवण्यास पोलिसांनी विरोध केला होता. एकीकडे अरबी समुद्रात कोट्यवधी रूपये खर्चून छत्रपती शिवरायांचे स्मारक उभारण्याचे नियोजन शासन करत आहे आणि दुसरीकडे मात्र पोलीस शिवजयंतीच्या मिरवणुकांवर बंदी आणत आहे, हे काय चालले आहे ? यातून पोलिसांचा उद्दामपणा वाढत चालला आहे, हेच जाणवते. याउलट ज्या टिपू सुलतानाने हिंदूंवर अत्याचार केले, त्याचा मात्र उदो-उदो केला जात आहे. त्याच्या मिरवणुका काढल्या जात आहेत.

छत्रपतींच्या महाराष्ट्रात त्यांच्या पुतळ्यांना, चित्रांना आणि मिरवणुकांना अशा प्रकारे प्रतिबंध घालण्याचे प्रमाण वाढतच चालले आहे. असे निर्णय कोणाच्या दबावाखाली आणि कोणाकडून घेतले जात आहेत, याचा शोध भाजप शासनाने घेतला पाहिजे. शिवजयंतीच्या कालावधीमध्ये असा निर्णय घेणाऱ्या प्रशासनावर कठोर कारवाई केली पाहिजे. हेच प्रशासन मशिदींच्या अवैध भोंग्यांवर उच्च न्यायालयाने बंदी आणलेली असतांनाही त्यांवर कारवाई करण्याचे धाडस दाखवत नाही; ईदच्या दिवशी रस्त्यावर नमाज पठन केले जाते, तेव्हाही काही करत नाही. गृहमंत्र्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधितांवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी हिंदूंची अपेक्षा आहे. तसेच पुढे अशा प्रकारच्या कृती होऊ नयेत, याचीही काळजी घ्यावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

आपला नम्र,

सुनील घनवट

श्री. सुनील घनवट, महाराष्ट्र राज्य संघटक,
हिंदू जनजागृती समिती, संपर्क क्र. ०९४०४९५६५३४